प्रेस नोट दि. ०८/०८/२०२६

**वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचा बनाव करून फिर्यादीस त्यांचे नावावर मनी लॉडरिंगची केस असल्याचे सांगुन त्यामध्ये अटक करण्याची भिती दाखवुन सर्वसामान्य नागरीकांच्या लाखो रूपयांचा बेमालूमपणे अपहार करणारे सायबर गुन्हेगारांच्या टोळीतील भारतातील सक्रिय हस्तक दहिसर पोलीस ठाणे, मुंबई यांनी गजाआड केले बाबत..**

दि.०४/०७/२०२६ रोजी दहिसर पुर्व, मुंबई येथे राहणारे फिर्यादी यांच्या तक्रारीवरून गु.र.क्र. ९८५/२०२६, कलम - ६१(२), २०४, ३०८(७), ३१८(४), ३१९(२), ३३६(२), ३३८, ३४०(२) भा.न्या.सं सह माहिती तंत्रज्ञान अधिनियम २००० चे कलम ६६(क), ६६(ड) ॲक्ट अन्वये नोंद करण्यात आला आहे.

सदर गुन्हयातील फिर्यादी महिला, वय ७१ वर्ष, राहणार दहिसर पुर्व, मुंबई यांना ०२/०७/२०२६ रोजी पासून ते दिनांक ०३/०७/२०२६ रोजी पर्यंत अनोळखी इसमांनी मो. नं.९८३३३७६२०१, ८४७५०१४८४५ यावरून वरिष्ठ पोलीस अधिकारी राजेश मिश्रा असल्याचा बनाव करून फिर्यादींची फसवणूक करण्याच्या इरादयाने मुंबई पोलीस नावांचा वापर करून फिर्यादींचे नावावर मनी लोड्रिंगची केस असल्याचे सांगितले.फिर्यादींना अटक करण्याची भिती दाखवून जबरदस्तीने वॉटस्अप कॉल द्वारे नजर कैदेत ठेवून फिर्यादींचे बॅंक खात्यांचे तपशिल व शिल्लक रक्कमा या बाबत लबाडीने माहिती प्राप्त करून गैरलाभ प्राप्त करण्याच्या उद्देशाने फिर्यादींचे स्टेट बॅंक ऑफ इंडिया खात्यामध्ये एकूण रूपये ४,५०,०००/- (अक्षरी - चार लाख पंन्नास हजार/-) इतकी रक्कम भरण्यास भाग पाडून त्यांची आर्थिक फसवणूक केली.

सदर गुन्हयात पाहिजे आरोपीतांनी वेगवेगळया बॅकांची करंट बॅक खाती सर्रासपणे वापर केली असून फिर्यादी यांनी सायबर गुन्हेगारांच्या सांगण्यावरून इंडसंइंड बॅक , खातेधारक महाकाल इंटरप्रायजेस, या खात्यामध्ये ४,५०,०००/- रूपये असे लाखो रूपये भरणा केले होते. सदर बेनिफिशरी बॅक खात्याशी लिंक असणारा ईमेल ॲड्रेस तयार करणारा तसेच सदरची फसवणुकीच्या वेळी नमुद ईमेल आयडी लॉगिन असणारा आरोपी याचा दहिसर पोलीस ठाणे, मुंबई चे तपासी पथक सपोनि पाचांगणे व पथक यांनी तांत्रिक व प्रत्यक्ष तपासाव्दारे उपरोक्त मुंबई येथून अटक करण्यात पोलीसांनी यश मिळवले आहे.

सदर बेनिफिशरी बॅक खातेदाराचा दहिसर पोलीस ठाणे, मुंबई चे तपासी पथक पोनि. वैशाली श्रावगी, सपोनि पाचांगणे व पथक यांनी तांत्रिक व प्रत्यक्ष तपासाव्दारे उपरोक्त बॅक खाती फसवणूकीची रक्कम स्विकारणारा भारतात सक्रिय असणारा मुख्य आरोपी व त्याचे साथीदार यांना मुंबई येथून अटक करण्यात पोलीसांनी यश मिळवले आहे.

**अटक आरोपी** - १. धिरजकुमार केसाराम प्रजापती, वय - २८ वर्ष, रा.ठी. कामठीपुरा, मुंबई

**अटक आरोपीचा गुन्हयातील सक्रिय सहभाग** - अटक आरोपी क्र १. धिरजकुमार केसाराम प्रजापत, वय - २८ वर्ष, रा.ठी. कामठीपुरा, मुंबई याने स्वत:ची मोबाईल मध्ये तयार केलेल्या ईमेल आयडी लिंक असलेल्या इंडसंड बॅक खात्यामध्ये ४,५०,०००/- एवढी रक्कम भरणा केली आहे.
नमुद आरोपी याने त्याच्या मोबाईल क्रमांकामध्ये नमुद वेळी सदरचा ईमेल ॲक्सेस केला असल्याचे स्पष्ट दिसुन येत असल्याने सदरचे मोबाईल क्रमांक धारक यांना नमुद गुन्हयातील पाहिजे आरोपी असे संबोधण्यात येत आहे.

त्यांनतर सदर आरोपीतांनी नमुद गुन्हयात सायबर गुन्हयातील फसवणुकीची रक्कम प्राप्त करून तिची विल्हेवाट लावली आहे.

तरी नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, अश्या प्रकारे अनोळखी सोशल मिडीया धारक व्हॉटसअप व्दारे अथवा सोशल मिडीयाव्दारे संपर्क करून पोलीस दलातील वरिष्ठ अधिकारी बोलत असल्याचे भासवुन तुमच्या नावे पोलीस केस असल्याची भीती दाखवुन तुम्हाला घाबरवुन आर्थिक फसवणुक करण्याचा प्रयत्न करू शकतात.त्यामुळे अशा कोणत्याच भीतीला बळी न पडता कोणताही आर्थिक व्यवहार न करता त्वरीत सायबर हेल्पलाईन १९३० येथे अथवा cybercrime.gov.in, sancharsaathi.gov.in येथे संपर्क करून तक्रार नोंद करावी.

सदरची उल्लेखनिय कामगिरी मा. पोलीस उपआयुक्त, उत्तर विभाग ०३, मुंबई श्री. गजानन देशमाने, मा. सहाय्यक पोलीस आयुक्त दहिसर विभाग मुंबई श्री.जयराज रणवरे, व.पो.नि. सर्जेराव पाटील, यांच्या मार्गदर्शनाखाली पो.नि. वैशाली श्रावगी, सपोनि संदिप पाचांगणे, पोउनि आकाश पाटील, पोउपनि श्रुती मालपोटे, पोह कल्पेश सुर्वे, पोशि श्रीकांत देशपांडे, पोशि नितीन चव्हाण, मपोशि सोनल मस्के यांनी पार पाडली आहे.

------000-----